महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३४७ वा | दिनांक : ०१/१२/२०२५ | वार : सोमवार

# राजेश अग्रवाल यांनी स्वीकारला मुख्य सचिव पदाचा पदभार



**मुंबई :** महाराष्ट्र राज्याचा विकास आणि गौरव वाढीसाठी सातत्याने काम करत राहणार, असे प्रतिपादन राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले आहे. राज्याचे मावळते मुख्य सचिव राजेशकुमार यांच्याकडून नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी रविवारी पदभार स्वीकारला. त्यावेळी ते बोलत होते.

मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव (अ.व.सु) राधिका रस्तोगी, मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद-सिंगल, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांच्यासह मुख्य सचिव कार्यालय व अन्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

राजेश अग्रवाल हे 1989 च्या तुकडीतील आयएएस अधिकारी असून तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांचे विशेष कौशल्य ओळखले जाते. आयआयटी दिल्ली येथून संगणक अभियांत्रिकीतील बी.टेक. पदवी मिळविल्यानंतर ते प्रशासनात दाखल झाले. राज्यात त्यांनी अकोला व जळगावचे जिल्हाधिकारी, तसेच मुंबई महापालिकेत उपआयुक्त म्हणून काम पाहिले आहे. राज्याच्या अर्थ व आयटी विभागात त्यांनी महत्त्वपूर्ण सुधारणा राबवल्या. याच अनुभवाच्या जोरावर केंद्रातही त्यांनी अनेक महत्त्वाच्या राष्ट्रीय योजनांमध्ये योगदान दिले आहे.

केंद्रात तैनात असताना अग्रवाल यांनी आधार, जनधन योजना, डिजिलॉकर, सामाजिक न्याय विषयक डिजिटल उपक्रम अशा प्रकल्पांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या कामामुळे देशातील डिजिटल प्रशासनाला गती मिळाली. सध्या ते सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या अपंग कल्याण विभागाचे सचिव म्हणून कार्यरत होते. त्यांचे राज्यात पुनरागमन होताच ते मुख्य सचिवपदाचे स्वाभाविक दावेदार ठरले.


# भाजपसोबत युती फक्त राजकीय : सना मलिक



**खुलताबाद :** नगर परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने शनिवारी सायंकाळी कमान मोहल्ला येथे सभा घेतली. आ. सना मलिक यांनी या वेळी भाजपसोबतची युती ही फक्त राजकीय असून विचारांची नाही, असे स्पष्ट केले. सना मलिक म्हणाल्या, अजित पवार यांचा पक्ष अल्पसंख्यांकांच्या हक्कासाठी कटिबद्ध आहे. लाडकी बहीण योजना सुरू ठेवण्याचे आश्वासन आम्ही दिले होते. ते पूर्ण केले आहे. खुलताबादसाठी पाणी फिल्टर प्रकल्प, घरकुल योजना, कब्रस्तान विकास यासारख्या सुविधा प्राधान्याने पूर्ण करू. या सभेत पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण यांनीही भाषण केले. त्यांनी खुलताबादला दत्तक घेण्याची घोषणा केली. नगर परिषद हद्द वाढवून शहराचा विकास मार्गी लावणार असल्याचे सांगितले. पात्र नागरिकांना घरकुल मंजूर करून देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सुरेश जाधव, तालुका कार्याध्यक्ष इद्रिस पटेल, हाजी अकबर बेग, ॲड. कैसरोद्दीन, शहराध्यक्ष गजानन फुलारे आदींची उपस्थिती होती.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ डिसेंबर २०२५


## नगरपरिषद निवडणूक प्रचार सभेत युतीच्या विजयाचा संकल्प



**कन्नड (अरुण थोरात) :** भारतीय जनता पार्टी - राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या वतीने नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्वाती ताई संतोष कोल्हे तसेच सर्व प्रभागांतील युतीचे नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ राज्याचे ओबीसी कल्याण व अपारंपरिक ऊर्जा मंत्री मा. श्री. अतुलजी सावे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य रॅली आणि जाहीर सभा उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाला भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, माजी आमदार नितिन पाटील, प्रा. संजय गव्हाणे, भरतभाऊ राजपूत, किशोर आबा पवार, संतोष कोल्हे, सुभाष काळे, सुनिल पवार, रमेश जाधव, ललित सुरासे, अर्चना ताई पवार, रामा मुळे, हरिष वाघ, प्रंशात अग्रवाल, मोहित जैन, राजेश बनकर, सौरभ कुलकर्णी ,सुनिल निकम, अजबसिंग राजपूत, कैलास अकोलकर यांसह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते. सभेला नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली असून यावेळी युतीच्या विजयाचा महाअभियान आणि विकासाच्या संकल्पाचा निर्धार करण्यात आला.

## पुस्तकांच्या सहवासात 'आनंददायी शनिवार' मराठा हायस्कूलमध्ये वाचन संस्कृतीचे नवसंजीवनी

**छत्रपती संभाजीनगर :** विवेकानंद शिक्षण संस्था संचलित छत्रपती संभाजीनगर मराठा हायस्कूल, चौराहा येथे 'आनंददायी शनिवार' एक आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. मोबाईलच्या वाढत्या आकर्षणामुळे विद्यार्थ्यांची पुस्तकांपासून दूर होत चाललेली पिढी लक्षात घेता, शिक्षकांनी स्वतः पुस्तक हातात घेऊन विद्यार्थ्यांसोबत वाचनाचा अनोखा उपक्रम राबवला.गेल्या काही काळात डिजिटल लाटेत हरवू लागलेल्या वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी देण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांना प्रेरित करणारा 'वाचन अनुभव उपक्रम' आयोजित केला. विद्यार्थी आणि शिक्षक एकाच ठिकाणी निवांत बसून पुस्तकांच्या सहवासात रमलेली ही दृश्ये शाळेत एक आगळीच शैक्षणिक ऊर्मी निर्माण करणारी ठरली.शाळेचे मुख्याध्यापक सुहास मडके यांनी उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, "वाचनातून विद्यार्थ्यांची एकाग्रता, विचारशक्ती आणि अभिव्यक्ती क्षमता उल्लेखनीयरीत्या वाढते." तर पर्यवेक्षक अशोक उगले यांनी शिक्षकांच्या पुढाकाराचे विशेष अभिनंदन करत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची रुची निश्चितच प्रबळ होईल, असा विश्वास व्यक्त केला. 'आनंददायी शनिवार' या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी अंबादास वाघ, शिवप्रसाद उबाळे, ललिता पारधी, सुनिता डायगव्हाणे, विजया सपकाळ, नरेंद्र महालपुरे, ढवळू बहिरम, वैशाली पवार, गीता लिंबाळकर आदींनी परिश्रम घेतले.

## शिक्षण आणि प्रशिक्षणाने अंतर्बाह्य बदल होतोच - डॉ. सुधाकर शेंडगे



**छत्रपती संभाजीनगर :** "ऑलिंपिक, विश्व क्रीडा स्पर्धेत अपंगानी जगजेत्तेपद मिळवणे असो की नुकताच महिलांनी भारतीय महिलांनी जिंकलेला क्रिकेट वर्ल्ड कप असो हे सारे यश शिक्षणातून मिळते . जगाचा , देशाचाच काय , प्रत्येक माणसांचा शिक्षण आणि प्रशिक्षणाने अंतर्बाह्य बदल होतोच" असे प्रतिपादन आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे संचालक डॉ. सुधाकर शेंडगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला वाणिज्य महाविद्यालयात केले . आजीवन शिक्षण विस्तार विभाग आयोजित दोन दिवसीय "विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. शेंडगे यांनी शिक्षितातील विघातकता कमालीची वाढत असून कायदेभंगाला आदर्शाचे स्वरूप येत असल्याबद्दल चिंतन करण्याची वेळ आली असल्याचे स्पष्ट करत शिक्षणातून नैतिकता , शील , बौद्धिक प्रामाणिकता वाढण्यासाठी मूल्यशिक्षणाची गरज स्पष्ट केली. प्रारंभी कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ.नवनाथ गोरे यांनी केले. सदर कार्यशाळेत संबोधी स्पर्धा प्रशिक्षण केंद्र अकादमीचे प्रा डॉ. साईकुमार बोराळकर यांनी स्पर्धा परीक्षेतील विविध संधी व तयारी विषयी मार्गदर्शन केले तसेच प्रा डॉ. कैलास इंगळे यांनी मानवी जीवनातील वाचन लेखन संवाद कौशल्याची उपयुक्तता अधोरेखित केली. उद्योजक राजेन्द्र पुराणे यांनी उद्योग व्यवसायातील अडचणी संधी संघर्ष व यशस्वितेचे सूत्र स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. आर .व्ही .मस्के यांनी कठोर परिश्रम, कामातील सातत्य, सकारात्मक वृत्ती व चिकाटी यातूनच उद्योग असो वा स्पर्धा परीक्षेतील यशाचे शिखर आत्मसात करता येईल असे सांगितले . यावेळी विकास कांबळे, गोविंद इंगळे, रवी सभादिंडे,आरती वाकोडे या विद्यार्थ्यांनी संविधान समजून घेतांना व शहीद हुतात्म्यांना अभिवादन या भित्तिपत्रकांचे विमोचन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले तर डॉ.समाधान गवई यांनी राज्यघटनेच्या प्रास्ताविकेची शपथ दिली. या कार्यशाळेसाठी उपप्राचार्य प्रा.एन.एम. करडे , डॉ. एस.पी. खिल्लारे, डॉ. बी.एन . शिंदे , डॉ.एस.पी.बुधवंत, डॉ. व्ही. जी. पिंगळे , अधिक्षक राजू पट्टेकर, यांच्यासह सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. पूजा वडमारे यांनी तर आभार डॉ. आरती पांडे यांनी व्यक्त केले. कार्यशाळेसाठी डॉ. गणेश खिल्लारे , डॉ. अकुलवार , डॉ. अशोक केवटे , डॉ. गरड मॅडम, डॉ. दिपाली गायकवाड, डॉ. संदिप गवई, डॉ.संजय खरात , डॉ. विजय आडे यांनी परिश्रम घेतले.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274


Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ डिसेंबर २०२५


## समाजाला आधुनिक विचारांचा वारसा देणारे महात्मा फुले! - प्रा. प्रल्हाद लुलेकर




**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षक संघातर्फे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त गांधी भवन येथे व्याख्यानमालेचे आयोजन केले होते यावेळी भाई चंद्रकांत चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा प्रल्हाद लुलेकर यांनी ज्योतिराव फुले यांच्या जीवनावर सविस्तर प्रकाश टाकत महात्मा फुले यांचे समाज सुधारणेसोबत शैक्षणिक आणि देशाच्या विकासात भरीव योगदान दिले हे समजून सांगितले. तसेच माजी शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख साहेबांनी टि ई टी समस्या नसून तीला सामोरे जावे लागेल हे अंत्यंत कायद्याच्या चौकटीत बसून कसा मार्ग काढायचा याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून उपस्थित शिक्षकांच्या समस्याचे उत्तम रित्या निराकरण केले. आणि अध्यक्षीय भाषणात प्रा डॉ उमाकांत राठोड यांनी शिक्षण प्रणालीतील भ्रष्टाचार व गुणवत्ता कशी खालावत चालली आहे व त्याला जबाबदार कोण ? हे स्पष्ट व परखड शब्दात समजून सांगितले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती सोनाली गव्हाणे यांनी केले. प्रमुख पाहूण्यांचा परिचय रावसाहेब बोरसे यांनी केला आणि आभार प्रदर्शन हे विनोद केनेकर यांनी केले यावेळी संघटनेचे पदाधिकारी नवनाथ मंत्री, अशोक ढमढेरे, विलास चव्हाण, डॉ. पद्माकर पगार, तुकाराम भवर, धनंजय भवर ,नाना सावंत, महाजन सर विलास चांदणे, विलास भुतेकर, कृष्णा गोंडे, पोपट आगवान , रामेश्वर गोराडे, रवींद्र मगर, संभाजी जाधव, सचिन मुसळे, सागर सूर्यवंशी, अजित जाधव, विनोद जाधव, प्रताप कोल्हे, मानसी भागवत, अरुणा चौधरी, सविता हिंगे, शितल कवडे, रेखा साकळे, स्वाती बोंडे, अर्चना चव्हाण, वैष्णवी चव्हाण यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

## खुलताबादचा आठवडी बाजार रद्द

**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद येथील नगर परिषद निवडणुकीसाठी मंगळवारी मतदान होणार आहे दुस-या दिवशी बुधवारीमतमोजणी होणार आहे त्यामुळे बुधवारी भरणारा आठवडी बाजार नगरपरिषदेच्या वतीने रद्द करण्यात आला आहे व्यापारी शेतकरी व दुकानदारांनी याची नोंद घेण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी स्वरूप कंकाळ यांनी केले आहे

## अहंकार

नको अहंकार<br>
कुणाच्या मनी<br>
जीवन आहे नश्वर<br>
असावे ध्यानी

अहंकाराने होई<br>
स्वत:चाच नाश<br>
समाजाकडून मिळेल<br>
टिकेचे पाश

मुखी साखर<br>
बोलतांना असावी<br>
एक दुसऱ्याशी<br>
कटूता नसावी

प्रेम करावे सर्वांवर<br>
जिवापाड नित्य<br>
एक दुसऱ्याशी सदा<br>
बोलावे सत्य

अहंकार सत्तेचा<br>
असू नये फार<br>
दु:खीतांची सेवा<br>
त्याहुनी अपार



- **रवींद्र चालीकवार**<br>
मु.पो.ता.महागाव<br>
जि.यवतमाळ<br>
मौ.९०११५५९१०६


प्रवेश सुरू<br>
डी.एम.एल.टी.<br>
P.G.DMLT<br>
फिजोओथेरिपी<br>
डिप्लोमा ऑप्थोमेट्री<br>
OT टेक्नीशियन<br>
X-Ray, ECG<br>
रेडीओलॉजी<br>
संपर्क<br>
9405109103


## डॉ किशोर रमेश देशपांडे यांची भाजपा कळवण तालुका अध्यात्म आघाडी प्रमुख म्हणून नियुक्ती



**कळवण :** आगामी नगरपंचायत महानगर पालिका जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका पार्श्वभूमीवर कार्य करता संवाद मेळाव्यात भाजप प्रवक्ते व मा केन्द्रीय मंत्री डॉ भारती ताई पवार व मा आमदार डॉ राहुल आहेर भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते व मित्र परिवार च्या उपस्थित डॉ किशोर रमेश देशपांडे यांची कळवण तालुका अध्यात्म आघाडी प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली समाजातील सर्व थरातुन शुभेच्छा चा वर्षाव करण्यात आला आगामी वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा देण्यात आल्या डॉ गौरव चंद्रात्रे यांनी शुभेच्छा दिल्या व भावी वाटचालीस शुभेच्छा देऊन गौरव करण्यात आला.

## उठ बळी तू लढण्यासाठी

उठ बळी तू लढण्यासाठी का तुजला जगण्याची भीती<br>
सरले रे तेल दिव्यातील सांग कशा जळतील वाती!! धृ !!

जरी देश हा तुझाच राजा<br>
तुला गाडण्या सारे टपले<br>
पोशिंदा रे तू जरी जगाचा<br>
पोट उपाशी भाळी लिहिले<br>
मातीमध्ये रक्त आटवता कुणब्या तुझीच माती माती!!१!!

काळोखाचे राज्य पसरता<br>
दिवे सगळे विझून गेले<br>
कर्ज वाढता रोज नव्याने<br>
गळफासास किती भेटले<br>
तूझ्या मरणाने सांग कधी सुटेल शिवार साडेसाती!!२!!

जग राजा निधड्या छातीने<br>
नको मरणाची ही बात रे<br>
तूच मावळा शिवरायांचा<br>
वाट अवकाळीची लाव रे<br>
हक्कासाठी ही झुंज आपली म्हणून घेऊ आसूड हाती!!३!!



**ज्ञानेश्वर गायके**<br>
कन्नड<br>
मो..९४०३३८४८८९


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.<br>
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.<br>
संपर्क क्र. 7588005002

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ डिसेंबर २०२५

# एड्सविरुद्धची समाजक्रांती : आजारापेक्षा कलंक घातक

दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस 'जागतिक एड्स दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ वैद्यकीयदृष्ट्या नसून सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि मानवी मूल्यांच्या स्तरावर अत्यंत मोठे आहे. कारण एड्स हा आजार मानवी शरीरावर जितका परिणाम करतो त्याहून अधिक तो सामाजिक मनोवृत्ती, पूर्वग्रह, भीती, अज्ञान आणि विषमता यांच्याशी संबंधित आहे. एड्सविषयी बोलताना जगाला सर्वप्रथम जे शिकावे लागले ते म्हणजे हा आजार वैद्यकीय उपचारांनी काही प्रमाणात नियंत्रित होऊ शकतो, पण समाजातील भीती, तिरस्कार आणि भेदभावाविरुद्धची लढाई अधिक कठीण आहे. त्यामुळेच जागतिक एड्स दिवस हा केवळ स्मरणदिन नसून जाणीव, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची आठवण करून देणारा दिवस आहे.एचआयव्ही आणि एड्सचा इतिहास पाहिला तर १९८० च्या दशकात जेव्हा हा आजार जगासमोर आला, तेव्हा विज्ञानापेक्षा अफवा, संशय आणि अंधविश्वास अधिक वेगाने पसरले. हा आजार 'पाप', 'अनैतिकता', 'भ्रष्ट वर्तन' किंवा 'सामाजिक अधःपतन' यांचे प्रतीक मानला जाऊ लागला. त्यामुळे एचआयव्हीग्रस्त व्यक्तीला लागणारा धक्का हा आजारापेक्षा समाजाच्या प्रतिक्रिया, बहिष्कार आणि मानसिक तणावामुळे जास्त गंभीर होता. समाजशास्त्र सांगते की कोणताही रोग हा केवळ शरीराशी संबंधित नसतो; तो समाजाच्या मूल्यव्यवस्था, नैतिकता, सत्ता, आर्थिक स्थिती आणि सांस्कृतिक मनोवृत्तीशी जोडलेला असतो. एड्स या आजाराने हे सत्य स्पष्ट केले.आज जगात एचआयव्हीवर उपचार उपलब्ध आहेत. 'अँटी रेट्रो व्हायरल थेरपी'मुळे एचआयव्हीसह दीर्घायुषी, निरोगी आणि सन्मानाने जीवन जगणे शक्य झाले आहे. तरीही ग्रामीण भागात आजही अनेक मिथके जिवंत आहेत, एड्स स्पर्शाने पसरतो, भांडी शेअर केल्याने होतो, रक्तदानातून किंवा एकत्र बसल्याने लागतो अशी चुकीची धारणा अनेकांची आहे. या अज्ञानामुळे तपासणी न करण्याकडे झुकणारा मानसिकतेचा अडसर निर्माण होतो, आणि वेळेवर उपचार मिळत नाहीत. समाजाने रोगापेक्षा त्या रोगाशी जोडलेल्या चुकीच्या समजुतींविरुद्ध लढा देणे आवश्यक आहे.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर एड्स ही केवळ आरोग्य समस्या नाही, तर सामाजिक अन्याय, गरीबी, लैंगिक असमानता, दलित-वंचित गटांवरील भेदभाव, स्थलांतर, हिंसा, वेश्या व्यवसाय, औषधांचे व्यसन, लैंगिक शिक्षणाचा अभाव आणि लिंगविषयक पूर्वग्रह यांचे प्रतिबिंब आहे. एचआयव्हीचा प्रसार जिथे जास्त आहे तेथील लोकसंख्या ही केवळ वैद्यकीय दृष्ट्या नाही तर सामाजिक दृष्ट्याही असुरक्षित आहे. स्थलांतरित कामगार, लैंगिक हिंसा सहन करणाऱ्या महिला, तृतीयपंथी समुदाय, वेश्या व्यवसायात असलेल्या महिला, इंजेक्शनच्या माध्यमातून ड्रग्ज घेणारे व्यक्ती, तरुण वयातील लैंगिक शिक्षणापासून वंचित विद्यार्थी आणि उपेक्षित समुदाय हे सर्व जास्त धोक्यात असतात. त्यांच्या जीवनातील असुरक्षितता आणि संसाधनांचा अभाव हा संसर्गाच्या जोखमीला वाढवतो.विशेषतः महिलांच्या संदर्भात एड्सचा प्रश्न समाजातील पितृसत्ताक रचनेशी थेट जोडलेला आहे. अनेक महिलांना विवाहानंतरही सुरक्षित लैंगिकतेबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार नसतो. कौटुंबिक नातेसंबंधातील असमानता महिलांना एड्सच्या धोक्यापासून दूर रहाण्याचा अधिकार हिरावून घेते. समाजात अजूनही 'पुरुषांच्या लैंगिक वर्तनाबाबत सहनशीलता' आणि 'स्त्रियांनी शांतपणे स्वीकारण्याची अपेक्षा' ही मानसिकता अनेक ठिकाणी दिसते. त्यामुळे एड्सविरोधातील लढाई ही स्त्री-पुरुष समानतेची लढाईही आहे.तृतीयपंथी समुदायाची स्थिती आणखी गुंतागुंतीची आहे. सामाजिक बहिष्कार, रोजगाराचा अभाव, शिक्षणातील दुय्यमता आणि आरोग्य व्यवस्थेतील दुर्लक्षामुळे त्यांना उपचार, समुपदेशन आणि सन्मानाने सेवा मिळणे कठीण ठरते. समाजाने लैंगिकता आणि लैंगिक अभिव्यक्तीच्या विविधतेला स्वीकारल्याशिवाय एड्स नियंत्रणाचा उद्देश पूर्ण होणार नाही.एचआयव्ही प्रतिबंधामध्ये जागरूकता, सुरक्षित लैंगिकतेचा प्रसार, रक्त आणि सुईंचे सुरक्षित नियमन, लैंगिक शिक्षण, समुपदेशन आणि तपासणी यांना फार महत्व आहे. परंतु त्याहून अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे समाजाची मानसिकता बदलणे. एचआयव्हीग्रस्त व्यक्तींविषयीचा तिरस्कार संपला पाहिजे. त्यांच्याशी गुन्हेगारासारखे नव्हे तर सहानुभूती, सन्मान आणि समजुतीने वागण्याची गरज आहे. आजाराशी झुंज देणाऱ्या व्यक्तीला समर्थनाची आवश्यकता असते, न्यायाची नव्हे.आज तंत्रज्ञानाद्वारे माहिती मिळवणे सोपे झाले आहे आणि युवा पिढी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारत आहे, ही बदलाची खूण आहे. शाळा-कॉलेज स्तरावर आरोग्य आणि लैंगिक शिक्षण अनिवार्य होणे गरजेचे आहे. माध्यमांनी सनसनाटीपेक्षा जागरूकतेची भूमिका निभावली पाहिजे. डॉक्टर, समाजशास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्था, शासन आणि नागरिक यांनी एकत्रितपणे वैज्ञानिक माहिती, संवेदनशीलता आणि मानवाधिकार यांवर आधारित कार्ययोजना राबवणे आवश्यक आहे.एड्सविरोधातील चालू मोहिमेत 'उपचार', 'प्रतिबंध' आणि 'जागरूकता' यांच्याबरोबरच 'मानवता' आणि 'समानतेचा अधिकार' हे दोन मुद्दे केंद्रस्थानी असायला हवेत. कारण एड्सविषयीचा सर्वात मोठा धोका हा रोग नाही, तर त्याच्याशी जोडलेला कलंक, भीती आणि सामाजिक न्यायाचा अभाव आहे. समाज बदलला, विचार बदलले, आणि प्रत्येक व्यक्तीला न्याय्य सन्मान मिळाला तर एड्स हा आजार नियंत्रणात आणणे आणि भविष्यात त्याचे उच्चाटन करणे शक्य होईल.म्हणूनच जागतिक एड्स दिन आपल्याला आठवण करून देतो की, एचआयव्हीग्रस्त व्यक्ती 'इतर' कोणी नाही तर तो आपल्याच समाजाचा, आपल्या मानवतेचा भाग आहे. आजारी शरीराला औषध मिळते, पण जखमी मनाला स्वीकार, आधार आणि सन्मान लागतो. आणि जेव्हा समाज उपचाराइतकाच सन्मान देईल, तेव्हा एड्सविरोधातील खरी लढाई जिंकली जाईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com

